महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

**Email ID : sangeeta.kholgadge@nic.in** दूरध्वनी क्र : ०२२-२२०६०५६८


---

<u>तात्काळ.</u>

क्र.राआयो-२०२३/प्र.क्र.९६ /योजना-१० दिनांक:- ०७ जुलै,२०२३.

प्रति,

कार्यकारी अध्यक्ष,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

**विषय : आवास प्लसमधील इतर प्रवर्गातील (Others Category) <u>मधील कुटुंबांची विगतवारी करण्याबाबत .</u>**

महोदय,

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत प्राप्त आवास प्लस मधील इतर प्रवर्गातील (Others Category) मधील कुटुंबाची प्रवर्गनिहाय विगतवारी करणे आवश्यक आहे. आवास प्लस सर्वेक्षणाअंतर्गत प्राप्त याद्यांमधून सुमारे २८ लक्ष हे इतर प्रवर्गातील (Other Category) कुटुंबे आहेत. यामध्ये इतर मागास वर्ग, अल्पसंख्याक व खुला या प्रवर्गातील कुटुंबांचा समावेश आहे. सदर याद्या जिल्हानिहाय, तालुकानिहाय व ग्रामपंचायतनिहाय आपणांस या पत्रासोबत व ई-मेल द्वारे Excel Sheet मध्ये पाठविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने जिल्हयांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

- सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी ग्रामपंचायतनिहाय याद्या प्राप्त झाल्याची खात्री करावी. तद्नंतर ग्रामसेवक व उपलब्ध कर्मचारी यांचेमार्फत इतर प्रवर्गातील (Other Category) याद्यांमधून इतर मागास प्रवर्ग (OBC), अल्पसंख्याक प्रवर्ग (Minority) व खुला प्रवर्ग (Open) ही कुटुंबे Mark करुन घ्यावीत व सदर याद्यांमधून इतर मागास प्रवर्ग (OBC), अल्पसंख्याक प्रवर्ग व खुला प्रवर्ग कुटुंबांच्या स्वतंत्र याद्या तयार कराव्यात.

(कृ.मा.प.)

- प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी जिल्हयातील इतर मागास प्रवर्ग (OBC), अल्पसंख्याक (Minority) व खुला प्रवर्ग (Open) यांची कुटुंब संख्या संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांना कळवावी.

उपरोक्त नमूद कार्यवाही <u>दि.२४ जुलै २०२३ पर्यंत</u> पूर्ण होईल, याची दक्षता घ्यावी.

आपला,

(का.गो. वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-</u>

१. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
२. उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
३. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व)